निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
शुक्रवार
२० फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३५५ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## छत्रपती शिवरायांच्या मार्गावर चालणे हाच विकासाचा खरा मार्ग - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे (प्रतिनिधी)** छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला मार्ग हाच खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकासाचा मार्ग आहे. त्यांनी प्रस्थापित केलेले रयतेचे राज्य, समता आणि न्यायाचा आदर्श जगासमोर ठेवण्यासाठी २०३० साली महाराजांची ४०० वी जयंती जागतिक स्तरावर भव्य स्वरूपात साजरी केली जाईल, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.किल्ले शिवनेरीवर आयोजित अधिकृत शिवजन्मोत्सव सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, अभिनेता रितेश देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**किल्ले शिवनेरीवर शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न; २०२४ मध्ये ४०० वी जयंती जागतिक स्तरावर साजरी करण्याची घोषणा**

**जागतिक वारसा स्थळाचा बहुमान:** पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पुढाकाराने शिवनेरीसह महाराष्ट्रातील १२ किल्ल्यांना युनेस्कोने (U N E S C O) 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून नामांकित केले आहे. २७ देशांनी याला एकमताने मान्यता दिली असून, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी याचे अधिकृत प्रमाणपत्र स्वीकारले.अतिक्रमणमुक्त किल्ले: शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष देणारे राज्यातील सर्व किल्ले लवकरच अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्णय सरकारने घेतला असल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले.

**शिवनेर भूषण पुरस्कार:** कार्यक्रमादरम्यान प्रगतशील शेतकरी स्व. पंकज वामन, डॉ. विनोद हांडे, लेफ्टनंट अजिंक्य मेहेर, शिवाजीराव खैरे आणि उपलेफ्टनंट श्रुतिका ताथवडे यांना 'शिवनेर भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात शिवजन्मस्थानी पारंपरिक पाळणा गायनाने झाली. पोलीस बँड पथकाने 'गर्जा महाराष्ट्र माझा' या राज्यगीताची धून वाजवून आणि हवेत बंदुकीच्या फैरी झाडून शिवरायांना मानवंदना दिली. त्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी बाल शिवाजी व जिजाऊंच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून महाराजांच्या प्रतिमेची पालखी खांद्यावर वाहिली. शालेय विद्यार्थ्यांनी महाराजांच्या जीवनावरील प्रसंग नाटिकांद्वारे सादर केले.या सोहळ्याला मराठा सेवा संघाचे पदाधिकारी, विविध खात्यांचे वरिष्ठ अधिकारी आणि हजारो शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### शिवनेरी विकासाचा ध्यास - सुनेत्रा अजित पवार

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्या म्हणाल्या, अजितदादांच्या पुढाकारातूनच 'किल्ले शिवनेरी विकास आराखडा' साकार झाला. जुन्नरला पर्यटन तालुका म्हणून विकसित करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. आग्रा येथे शिवस्मारक आणि वढू-तुळापूर येथील छत्रपती संभाजी महाराज बलिदान स्थळाचे काम वेगाने सुरू आहे.

### बलशाली महाराष्ट्राचा निर्धार - एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवरायांच्या सुशासनाचा उल्लेख करत म्हटले की, शिवरायांची 'शिवराई' चलन व्यवस्था आणि जलव्यवस्थापन हे आजही मार्गदर्शक आहे. बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यात 'किल्ले स्वच्छता व जतन मोहीम' अधिक वेगाने राबवली जाईल. तसेच 'लाडकी बहीण' योजनेतून महिला सक्षमीकरणाचा विचार पुढे नेला जात आहे.

## अर्थखात्याच्या आडमुठ्या धोरणामुळे एसटी कर्मचाऱ्यांची होळी; 'बोंब मारो' आंदोलनाद्वारे सरकारची कानउघडणी करणार!

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** राज्य सरकारचे अर्थ खाते झोपेचे सोंग घेत असून, त्यांच्या आडमुठेपणामुळे ८६ हजार एसटी कर्मचाऱ्यांच्या हक्काचा पैसा अडकून पडला आहे. आता फक्त विनंती करून चालणार नाही, तर आझाद मैदानावर 'बोंब मारो' आंदोलन करून या मुजोर अधिकाऱ्यांची कानउघडणी केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा जळजळीत इशारा महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी दिला आहे.

एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना या महिन्यात वेतनासोबत मिळणारा वेतनवाढ फरक हप्ता (arrears) मिळालेला नाही. धक्कादायक बाब म्हणजे, या निधीसंदर्भातील फाईल गेल्या १० फेब्रुवारीपासून अर्थ खात्यात धूळ खात पडून आहे. महामंडळाने १६ वेळा पत्रव्यवहार केला, परिवहन मंत्र्यांनी पाठपुरावा केला, तरीही अर्थ खात्यातील अधिकारी ढिम्म हलण्यास तयार नाहीत.

**२४ फेब्रुवारीला मुंबईत एल्गार!**

अर्थ खात्याच्या या मनमानी कारभाराविरोधात कामगारांमध्ये प्रचंड असंतोष असून,आता आंदोलनाचे हत्यार उपसण्यात आले आहे.

**आंदोलनाचे स्वरूप:** 'बोंब मारो' आंदोलन

**दिनांक:** २४ फेब्रुवारी २०२६.

**ठिकाण:** आझाद मैदान, मुंबई.

**मागणी:** सोमवारपर्यंत उर्वरित निधी तातडीने मंजूर करावा.

**आकडेवारीचा खेळ आणि कर्मचाऱ्यांची कुचंबणा**

राज्य सरकारकडे एसटी महामंडळाने एकूण ७२५.४६ कोटी रुपयांची मागणी केली होती. यामध्ये खालील बाबींचा समावेश होता.

**वेतनवाढ फरक रक्कम:** १९२.४६ कोटी रुपये.सवलत **मूल्य प्रतिपूर्ती:** उर्वरित रक्कम.मात्र, सरकारने केवळ ४०० कोटी रुपये देऊन बोळवण केल्याने एसटीचे आर्थिक गणित कोलमडले आहे. परिणामी, ८६ हजार कामगारांना त्यांच्या हक्काच्या वाढीव रकमेपासून वंचित राहावे लागले आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक स्वतः या विषयात लक्ष घालत आहेत, पण अर्थ खात्याचे अधिकारी कुणाचेच ऐकायला तयार नाहीत. हे अधिकारी नेमके कोणाच्या आशीर्वादाने सुस्त झाले आहेत? असा सवालही बरगे यांनी उपस्थित केला आहे.

**मुख्यमंत्र्यांना साकडे**

सध्या अर्थ खात्याचा प्रभार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनीच आता या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालून झोपेचे सोंग घेतलेल्या अधिकाऱ्यांना जागे करावे, अन्यथा कर्मचाऱ्यांचा आक्रोश सरकारला महागात पडेल, असेही संघटनेने स्पष्ट केले आहे.

## अमोल जंजाळ यांची राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कन्नड तालुका उपाध्यक्षपदी निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी)** कन्नड तालुक्यातील आदर्श गाव वाकी येथील तंटामुक्ती अध्यक्ष अमोल भाऊसाहेब जंजाळ यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार गट) कन्नड तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. सुनील निकम यांनी या निवडीबाबत सविस्तर माहिती दिली.पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली, तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आ. सतीश चव्हाण, कन्नड तालुक्याचे माजी आमदार नितीन पाटील आणि तालुकाध्यक्ष कैलास आबा अकोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली आहे.अमोल जंजाळ हे एक निष्ठावान कार्यकर्ते असून, त्यांच्या निवडीमुळे ग्रामीण भागात पक्षाची नाळ अधिक घट्ट होण्यास मदत होणार आहे.



## छत्रपती शिवाजी महाराजांच्या आचरणाचा व विचारांचा वारसा पुढच्या पिढीने जोपासला पाहिजे - डॉ. राहुल म्हस्के




**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/सिल्लोड शिक्षण संस्था संचलित नालंदा बी.सी.ए. महाविद्यालय, एन-११ हडको येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सिल्लोड शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. राहुल म्हस्के यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रविण मस्के आणि सांस्कृतिक कार्यक्रमाधिकारी प्रा. जयश्री राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. राहुल म्हस्के यांनी खालील महत्त्वाचे विचार मांडले. स्वराज्याची संकल्पना: १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी मांडलेली स्वतःच्या राज्याची संकल्पना अत्यंत धाडसी होती.प्रशासकीय कौशल्य: महाराज केवळ उत्कृष्ट रणनितीकार आणि 'गनिमी कावा' वापरणारे योद्धेच नव्हते, तर ते एक उत्तम प्रशासकही होते.

काळाची गरज: आज २१ व्या शतकात जगत असतानाही स्वाभिमान, नेतृत्व, संघटन कौशल्य आणि दूरदृष्टी या मूल्यांची तितकीच गरज आहे. **तरुण पिढीची जबाबदारी:** महाराजांचा गौरवशाली इतिहास आजच्या तरुण पिढीने आत्मसात करून त्यांच्या आचरणाचा व विचारांचा वारसा जोपासणे गरजेचे आहे.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनिषा राकडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. समृद्धी गोरे यांनी मानले. या सोहळ्यासाठी श्रीमती सुवर्णा कटारे, ऋषिंदर मानकर, अनिल साळवे, समाधान भालेराव, संजय बनकर यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सावधान! आरटीओच्या नावाने फसवणूक

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** राज्यातील वाहनधारक आणि चालकांनो सावधान! जर तुम्हाला तुमच्या मोबाईलवर 'ई-चलन' भरण्याबाबत किंवा 'लायसन्स सस्पेंड' होण्याबाबत एखादा मेसेज आला असेल, तर त्यावर क्लिक करण्यापूर्वी दहावेळा विचार करा. सध्या बनावट वेबसाईटस्, संशयास्पद मोबाईल प्स (APK) आणि खोट्या ई-चलन लिंकद्वारे नागरिकांची मोठी आर्थिक फसवणूक होत असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाने जनतेला सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

**बनावट वेबसाईट आणि ई-चलन लिंकपासून दूर राहण्याचे परिवहन विभागाचे आवाहन**

फसवणुकीची पद्धत: नक्की काय घडतेय?सायबर चोरटे सध्या एसएमएस (SMS) किंवा व्हॉट्सपचा वापर करून नागरिकांना जाळ्यात ओढत आहेत. यामध्ये प्रामुख्याने खालील प्रकारच्या धमक्या किंवा आमिषे दिली जातात:ई-चलन दंड: तुमच्या वाहनाचा दंड थकीत आहे, तो त्वरित भरा अन्यथा कारवाई होईल. लायसन्स रद्द करण्याची भीती: तुमचे ड्रायव्हिंग लायसन्स सस्पेंड होणार आहे, ते वाचवण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करा.बनावट प्स: व्हॉट्सपवरून RTO Services.apk, mParivahanšUpdate.apk किंवा eChallan Pay.apk यांसारख्या फाईल्स पाठवून त्या डाऊनलोड करण्यास भाग पाडले जाते.

यामुळे तुमच्या मोबाईलमधील ओटीपी (OTP) आणि बँकिंग माहिती चोरीला जाऊ शकते.परिवहन विभागाचा महत्त्वाचा खुलासासह परिवहन आयुक्त (संगणक) शैलेश कामत यांनी स्पष्ट केले आहे की, परिवहन विभाग किंवा आरटीओ कार्यालय कधीही कोणत्याही नागरिकाला व्हॉट्सपवरून थेट पेमेंट लिंक पाठवत नाही. त्यामुळे अशा लिंक्स पूर्णपणे बनावट आहेत, असे समजावे.अधिकृत संकेतस्थळांचाच वापर करानागरिकांनी फसवणूक टाळण्यासाठी फक्त सरकारी डोमेन असलेल्या (gov.in) अधिकृत वेबसाईटचाच वापर करावा:सेवाअधिकृत वेबसाईट (Official Website) वाहन नोंदणी (VAHAN) vahan.parivahan.gov.in लायसन्स सेवा (SARATHI)sarathi.parivahan.gov.inB©-चलन पोर्टलसंशयास्पद लिंक काढलीएकत्रित सेव www.parivahan.gov.in टीप: ज्या वेबसाईटच्या शेवटी .com, .online, .site किंवा .in आहे, अशा अनधिकृत साईट्सवर आपली कोणतीही माहिती भरू नका.

फसवणूक झाल्यास काय करावे?जर तुमची किंवा तुमच्या ओळखीच्या कोणाची फसवणूक झाली असेल, तर त्वरित खालील पावले उचला:हेल्पलाईन: नॅशनल सायबर क्राईम हेल्पलाईन क्रमांक १९३० (१९३०) वर त्वरित कॉल करा.ऑनलाईन तक्रार: www.cybercrime.gov.in या पोर्टलवर आपली तक्रार नोंदवा.

पोलीस स्टेशन: जवळच्या जिल्हा सायबर पोलीस स्टेशनशी संपर्क साधा.

## संक्षिप्त

### जालना रेल्वे स्थानकावर 'ऑपरेशन उपलब्ध' अंतर्गत मोठी कारवाई; तिकीट दलाल जेरबंद

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** रेल्वे प्रवाशांची लूट करणाऱ्या आणि आरक्षण प्रणालीत बेकायदेशीर हस्तक्षेप करणाऱ्या दलालांविरुद्ध रेल्वे संरक्षण दलाने (RPF) कंबर कसली आहे. 'ऑपरेशन उपलब्ध' या विशेष मोहिमेअंतर्गत आरपीएफ नांदेड विभाग आणि जालना पोस्टच्या संयुक्त पथकाने १८ फेब्रुवारी २०२६ रोजी जालना रेल्वे स्थानकावर छापा टाकून एका तिकीट दलालाला रंगेहात पकडले.

**गुप्त माहितीच्या आधारे सापळा**

मिळालेल्या विश्वसनीय माहितीनुसार, जालना रेल्वे स्थानकावरील तिकीट आरक्षण केंद्रावर (PRS) दलालांचा वावर वाढल्याचे समोर आले होते. त्यानुसार १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११:२० च्या सुमारास पथकाने विशेष तपासणी मोहीम राबविली. या पथकात आरपीएफ नांदेडचे एएसआय अमोल वावळे, कॉन्स्टेबल रणजित सिंग, परतूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय वाघ आणि जालना आरपीएफच्या कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

**साहित्य आणि रोख रक्कम जप्त**

या कारवाईदरम्यान जालना शहरातील एका संशयित व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले. त्याची झडती घेतली असता खालील साहित्य जप्त करण्यात आले:

दोन रेल्वे आरक्षण तिकिटे: (किंमत १,२७०/-),आरक्षण अर्ज: २ भरलेले आणि ५ कोरे मागणी अर्ज.कमिशनसाठी प्रवाशांची लूट

चौकशीदरम्यान आरोपीने आपला गुन्हा कबूल केला आहे. गेल्या एक महिन्यापासून तो रेल्वे काउंटरवरून तिकिटे काढून प्रवाशांकडून जास्तीचे कमिशन उकळत होता. जप्त केलेल्या दोन तिकिटांमागे त्याने ६३० रुपये कमिशन घेतल्याची कबुलीही त्याने दिली आहे.

आरोपीवर रेल्वे कायद्याच्या कलम १४३ अन्वये गुन्हा (क्र. ८२/२०२६) दाखल करण्यात आला आहे. जप्ती पंचनामा आणि कबुलीजबाब नोंदवल्यानंतर, आरोपीला इछडड-२०२३ च्या कलम ३५(३) नुसार नोटीस बजावण्यात आली आहे. त्याला न्यायालय किंवा रेल्वे प्राधिकरणासमोर हजर राहण्याच्या अटीवर सध्या सोडण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

नांदेड रेल्वे विभागाने प्रवाशांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. रेल्वे तिकिटे केवळ अधिकृत काउंटर किंवा अधिकृत ॲप/वेबसाईटवरूनच खरेदी करावीत. दलालांकडून तिकीट घेणे बेकायदेशीर असून, यामुळे प्रवाशांची आर्थिक फसवणूक होऊ शकते. कोणत्याही संशयास्पद हालचाली आढळल्यास रेल्वे प्रशासनाला त्वरित कळवावे.

### शिवरायांचे स्मरण केल्यास अंगी आत्मविश्वास बाणतो: आमदार अर्जुन खोतकर



**जालना येथे सांस्कृतिक कार्य संचालनालय व जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे शिवजयंती उत्साहात साजरी**

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** छत्रपती शिवाजी महाराजांच्या रक्तात भीती नावाच्या पेशीच नव्हत्या, म्हणूनच त्यांनी प्रत्येक कार्य निर्भयपणे पूर्ण केले. शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाचे आणि त्यांच्या शौर्याचे स्मरण केल्यास प्रत्येकामध्ये नवा आत्मविश्वास निर्माण होतो, असे प्रतिपादन माजी मंत्री तथा आमदार अर्जुन खोतकर यांनी केले.

सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई व जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवजयंती निमित्त विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह (टाऊन हॉल) येथे पार पडलेल्या या सोहळ्यात श्री. खोतकर बोलत होते.

कार्यक्रमात बोलताना अर्जुन खोतकर यांनी महाराजांच्या प्रशासकीय कौशल्यांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की,स्वराज्य म्हणजे स्वाभिमान: शिवरायांनी स्वराज्य म्हणजे केवळ सत्ता नसून तो रयतेचा स्वाभिमान आहे, हे आपल्या कृतीतून सिद्ध केले.

सुशासनाचा पाया: त्यांनी त्या काळी लोकाभिमुख प्रशासनाची निर्मिती करून 'गुड गव्हर्नन्स'चा पाया रचला,बहुआयामी व्यक्तिमत्व: शिस्तबद्ध प्रशासन, सूक्ष्म निरीक्षण क्षमता, उत्कृष्ट युद्धनिती आणि आधुनिक विचारसरणी हे महाराजांच्या व्यक्तिमत्वाचे महत्त्वाचे पैलू होते. ते केवळ योद्धेच नव्हते, तर एक उत्तम अर्थतज्ञही होते.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण शाहीर रामानंद उगले यांचा पोवाड्यांचा कार्यक्रम ठरला. त्यांनी आपल्या पहाडी आवाजात शिवजन्माचा इतिहास,राजमाता जिजाऊंनी शिवरायांवर केलेले संस्कार,अफजलखानाचा वध आणि शिवरायांचे शौर्य,'दोनच राजे इथे गाजले' आणि 'गाडी घुंगराची' यांसारख्या प्रसिद्ध रचना सादर केल्या.या बहारदार सादरीकरणाला उपस्थित शिवप्रेमींनी उत्स्फूर्त दाद दिली.या कार्यक्रमाला जालन्यातील प्रमुख पदाधिकारी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यामध्ये वंदना मगरे (महापौर), राजेश राऊत (उपमहापौर),मिन्नू पी. एम. (मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.), अजयकुमार बन्सल (पोलीस अधीक्षक),शशिकांत हदगल (निवासी उपजिल्हाधिकारी), मनिषा दांडगे (उपजिल्हाधिकारी, रोहयो),रामदास दौंड (उपविभागीय अधिकारी), छाया पवार (तहसीलदार, जालना), अतुल बने (तहसीलदार, बदनापूर),महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम आणि उपायुक्त नंदा गायकवाड यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

जालना शहरात दोन दिवस चाललेल्या या उपक्रमामुळे शिवरायांच्या विचारांचा वारसा पुन्हा एकदा जनमानसात ताजा झाला असून, नागरिकांनी या कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.

# निवृत्तीनंतरचे 'मौन' की अभिव्यक्ती स्वातंत्र्य? २० वर्षांच्या 'कूलिंग-ऑफ' कालावधीचा पेच

**भारतीय लोकशाहीत विचार मांडण्याचे स्वातंत्र्य सर्वांना आहे, पण जेव्हा हा विषय देशाच्या सर्वोच्च सुरक्षा यंत्रणेतील माजी अधिकाऱ्यांशी संबंधित असतो, तेव्हा 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' आणि 'राष्ट्रीय गोपनीयता' यांमधील रेषा धूसर होऊ लागते. माजी लष्करप्रमुख जनरल मनोज मुकुंद नरवणे यांच्या 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' या आत्मचरित्रावरून सुरू असलेला वाद आता एका नवीन धोरणात्मक निर्णयाकडे वळण्याची शक्यता आहे. निवृत्तीनंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांवर पुस्तक लिहिण्यासाठी चक्क २० वर्षांचा 'कूलिंग-ऑफ' कालावधी लादण्याचा विचार सरकार करत असल्याचे वृत्त आहे.**

**या संपूर्ण प्रकरणाच्या केंद्रस्थानी जनरल नरवणे यांचे अप्रकाशित आत्मचरित्र आहे. २०20 मधील भारत-चीन सीमावाद, गलवान खोऱ्यातील संघर्ष आणि 'अग्निपथ' योजनेची अंमलबजावणी यांबाबत त्यांनी पुस्तकात केलेली भाष्ये संवेदनशील मानली जात आहेत. विशेषतः, पँगोंग त्सो येथील लष्करी हालचालींबाबत राजकीय नेतृत्वाकडून वेळेत स्पष्ट निर्देश मिळाले नसल्याचा जो उल्लेख पुस्तकात असल्याचा दावा केला जात आहे, तो सरकारसाठी अडचणीचा ठरला आहे.**

**या पुस्तकाची प्रत संसदेत येणे आणि सोशल मीडियावर त्याचे पीडीएफ फिरणे, यातून सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून दिल्ली पोलिसांनी याप्रकरणी एफआयआरही दाखल केला आहे.सध्याच्या नियमांनुसार (उउड नियम २०२१ सुधारणा), संवेदनशील माहिती प्रसिद्ध करण्यापूर्वी माजी अधिकाऱ्यांना संबंधित मंत्रालयाची परवानगी घेणे अनिवार्य आहे. मात्र, आता चर्चेत असलेला २० वर्षांचा कालावधी हा अत्यंत मोठा आहे.**

**सुरक्षेचा तर्कः अनेक मंत्र्यांचे असे मत आहे की, उच्च पदावर असताना घेतलेले निर्णय आणि धोरणात्मक गुप्त माहिती ही देशाच्या सुरक्षेसाठी दीर्घकाळ गोपनीय राहणे आवश्यक असते. तात्काळ पुस्तक लिहिल्याने तत्कालीन राजकीय आणि लष्करी संवेदनशीलतेचा फायदा शत्रू राष्ट्र घेऊ शकतात.टीकाकारांचा सूरः २० वर्षांचा काळ म्हणजे एका पिढीचा कालावधी होय. तोपर्यंत त्या घटनांचा संदर्भ आणि त्यातील जिवंतपणा हरवलेला असतो. माजी अधिकाऱ्यांचे अनुभव हे इतिहासाचे दस्तऐवज असतात, त्यावर इतकी मोठी बंदी घालणे म्हणजे त्यांच्या अनुभवांवर आणि स्वातंत्र्यावर गदा आणण्यासारखे आहे, असा एक मतप्रवाह आहे.सध्या 'ऑफिशिअल सिक्रेट्स क्ट' (जषषळलळरश्र डशलीशीी -लीं) आणि 'सेन्ट्रल सिव्हिल सर्व्हिसेस' नियमांनुसार कोणत्याही माजी अधिकाऱ्याला राष्ट्रीय सुरक्षेशी तडजोड करणारी माहिती उघड करण्यास मनाई आहे. तरीही, संरक्षण मंत्रालयाने गेल्या चार वर्षांत ३५ पुस्तकांना मंजुरी दिली आहे. नरवणे यांचे पुस्तक मात्र अजूनही 'प्रलंबित' यादीत आहे, जे या विषयातील गुंतागुंत स्पष्ट करते.**

**प्रशासकीय पारदर्शकता आणि राष्ट्रीय सुरक्षा यांचा समतोल राखणे हे कोणत्याही सरकारपुढील मोठे आव्हान असते. २० वर्षांचा 'कूलिंग-ऑफ' कालावधी लागू केल्यास, भविष्यात महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांचे सत्य बाजूला राहून केवळ अधिकृत सरकारी आवृत्तीच लोकांपर्यंत पोहोचेल, अशी भीती नाकारता येत नाही.सरकारने हा आदेश जारी केल्यास, तो केवळ लष्करी अधिकाऱ्यांपुरता मर्यादित असेल की आयबी, रॉ आणि सनदी अधिकाऱ्यांनाही लागू होईल, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. शेवटी, सुरक्षितता महत्त्वाची आहेच, पण अनुभवांच्या देवाणघेवाणीतून येणारी प्रगल्भताही लोकशाहीसाठी तितकीच आवश्यक आहे.**

# 'ज्यापाशी आरमार, त्याचा समुद्र' : भारतीय नौदलाचे जनक शिवछत्रपती

छत्रपती शिवाजी महाराजांनी 'ज्यापाशी आरमार, त्याचा समुद्र' हे सूत्र ओळखून परकीय सत्तेला रोखण्यासाठी स्वदेशी आरमार, अभेद्य जलदुर्गांचे कवच उभारले. त्यांची हीच दूरदृष्टी आणि 'आत्मनिर्भर' विचारसरणी आजही भारताच्या सागरी सुरक्षेचा अभेद्य पाया आहे. छत्रपती शिवरायांच्या जयंती त्यानिमित्त या विषयावर थोडक्यात टाकलेला प्रकाश.

सतराव्या शतकातील भारताची राजकीय स्थिती पाहिली, तर एका विचित्र विरोधाभासाचे दर्शन घडते. उत्तरेकडे मोगलांचे साम्राज्य शिखरावर होते. जमिनीवर त्यांची ताकद अफाट होती, पण समुद्राकडे पाहण्याची त्यांची दृष्टी अत्यंत संकुचित होती. याउलट, भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर विशेषतः कोकणात परकीय सत्तांनी धुमाकूळ घातला होता. पोर्तुगीज, इंग्रज, डच आणि जंजिऱ्याचे सिद्दी यांनी अरबी समुद्रावर आपले वर्चस्व निर्माण केले होते. परिस्थिती इतकी बिकट होती की, खुद्द मोगल बादशहालाही मक्केला यात्रेसाठी जायचे असेल, तर पोर्तुगीजांकडून 'काटाझ' (Cartaz) नावाचा परवाना घ्यावा लागत असे. हा परवाना नसेल, तर जहाजे बुडवली जात किंवा जप्त केली जात. भारतीय व्यापाऱ्यांची अवस्था तर त्याहून दयनीय होती. परकीय सत्तांच्या या 'सागरी दादागिरी'ला आणि त्यांच्या 'ब्लू वॉटर पॉलिसी'ला (Blue Water Policy) सुरुंग लावण्याचे धाडस केवळ एकाच राजाने दाखवले, ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज!



महाराजांनी अगदी सुरुवातीलाच हे ओळखले होते, की परकीय सत्तांचे बळ त्यांच्या आरमारात आहे. त्यांना केवळ जमिनीवरील लढाईत हरवून चालणार नाही, तर समुद्रातच त्यांची नाकेबंदी करणे आवश्यक आहे. यातूनच 'ज्यापाशी आरमार, त्याचा समुद्र' (Jalmev Yasya, Balmev Tasya) हे सुप्रसिद्ध सूत्र जन्माला आले. हे केवळ एक वाक्य नव्हते, तर ती भारताच्या भावी सागरी सुरक्षेची आणि सार्वभौमत्वाची पहिली गर्जना होती.

स्वदेशी बनावटीचा आग्रह

सन १६५७ मध्ये कल्याण आणि भिवंडी ही शहरे स्वराज्यात आल्यानंतर महाराजांनी आरमार उभारणीला गती दिली. सुरुवातीला त्यांनी पोर्तुगीज तंत्रज्ञांची मदत घेतली खरी, पण परकीयांवर अवलंबून राहणे भविष्यात धोक्याचे ठरेल, हे त्यांनी तातडीने ओळखले. त्यांनी स्थानिक कारागिरांना जहाजबांधणीचे प्रशिक्षण दिले. युरोपीय जहाजे प्रामुख्याने 'ओक' (Oak) लाकडापासून बनलेली असत. महाराजांनी कोकणातील स्थानिक 'सागवान' लाकडाची निवड केली. सागवान हे लाकूड उष्णकटिबंधीय खाऱ्या पाण्यात ओकपेक्षा अधिक काळ टिकते आणि कुजत नाही, हे वैज्ञानिक सत्य महाराजांनी त्या काळात ओळखले होते. कल्याण, भिवंडी आणि पेण येथील गोदीमध्ये (Shipyards) रात्रंदिवस काम सुरू झाले आणि स्वराज्याची पहिली लढाऊ जहाजे समुद्रात उतरली.

भौगोलिक परिस्थिती आणि गनिमी कावा

मराठा आरमाराची रचना करताना महाराजांनी कोकणच्या भौगोलिक परिस्थितीचा खुबीने वापर केला. इंग्रज आणि पोर्तुगीजांची जहाजे आकाराने प्रचंड आणि खोल तळाची (Deep Draft) होती. ती खोल समुद्रात वेगाने धावू शकत, पण उथळ खाड्यांमध्ये किंवा खडकाळ किनाऱ्यावर ती निकामी ठरत. यालाच प्रतिशह देण्यासाठी महाराजांनी मुद्दाम 'उथळ तळाची' (Shallow Draft) आणि आकाराने मध्यम जहाजे तयार केली. यात गुराब, गलबत, पाल, मचवा, होडी आणि तरांडी यांचा समावेश होता.

रणनीती अगदी साधी पण प्रभावी होती. मराठा जहाजे शत्रूच्या मोठ्या जहाजांना उथळ पाण्यात किंवा अरुंद खाडीत खेचून आणत. तिथे शत्रूचे मोठे जहाज अडकले, की मराठ्यांच्या छोट्या वेगावान बोटी चहुबाजूने हल्ला चढवत. शत्रूच्या तोफांची दिशा फिरण्याआधीच मराठे जहाजावर चढून 'हँड-टू-हँड' लढाई करत. समुद्रातील या 'गनिमी काव्या'मुळे बलाढ्य युरोपीय सत्तांना कोकणच्या किनाऱ्यावर कधीच पूर्ण ताबा मिळवता आला नाही.

**जलदुर्गः स्वराज्याचे अभेद्य कवच**

शिवाजी महाराजांनी आरमाराला बळ देण्यासाठी सागरी किल्ल्यांची एक साखळीच निर्माण केली. हे किल्ले म्हणजे केवळ संरक्षणात्मक वास्तू नव्हत्या, तर ते आरमाराचे 'लॉजिस्टिक हब' आणि 'वॉच टॉवर्स' होते. सिंधुदुर्ग किल्ल्याचे उदाहरण घेतले, तर आजही थक्क व्हायला होते. हिरोजी इंदुलकरांनी या किल्ल्याचा पाया भरताना ५०० खंडी शिसे (Lead) वापरले, जेणेकरून लाटांच्या तडाख्यात पाया हलू नये.

विजयदुर्ग किल्ल्याची रचना तर आणखीनच कल्पक होती. तिथे समुद्राच्या पाण्याखाली एक संरक्षक भिंत बांधली होती, जी भरतीच्या वेळी दिसत नसे. शत्रूची जहाजे वेगाने किल्ल्याकडे येताना या भिंतीवर आदळून फुटत, पण मराठ्यांच्या उथळ बोटी त्यावरून सहज जात. खांदेरी, उंदेरी आणि कुलाबा यांसारख्या किल्ल्यांनी मुंबईच्या इंग्रजांवर वचपा ठेवला होता.

आधुनिक भारताला प्रेरणा

महाराजांचे आरमार केवळ संरक्षणात्मक नव्हते, तर ते आक्रमकही होते. १६६४ मध्ये ८५ जहाजांच्या ताफ्यासह त्यांनी कर्नाटकातील बसरूरवर (कुंदापूर) केलेला यशस्वी हल्ला, हे मराठा आरमाराच्या 'शक्ती प्रक्षेपणाचे' (Power Projection) उत्तम उदाहरण आहे. मायनाक भंडारी, लाय पाटील, दर्यासारंग आणि पुढे कान्होजी आंग्रे यांसारखे निष्ठावान आणि पराक्रमी नौदल प्रमुख या आरमारात घडले. स्थानिक कोळी आणि भंडारी समाजाला संघटित करून महाराजांनी खऱ्या अर्थाने एक 'लोक-आरमार' उभे केले.

आजच्या भारताचे 'महासागर' (Mutual and Holistic -dvancement for Security and Growth across Regions) धोरण आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांची मुळे शिवरायांच्या विचारसरणीतच सापडतात. भारतीय नौदलाने आपल्या ध्वजावर शिवमुद्रेचा अष्टकोनी आकार स्वीकारून महाराजांच्या वारशाचा सन्मान केला आहे. भारताची पहिली स्वदेशी विमानवाहू युद्धनौका 'आयएनएस विक्रांत' ही शिवरायांच्या स्वदेशी जहाजबांधणीच्या स्वप्नाचे आधुनिक रूप आहे.

३५० वर्षांपूर्वी महाराजांनी दिलेला हा द्रष्टेपणा आजही तितकाच महत्त्वाचा आहे. भारताच्या सागरी सीमा सुरक्षित ठेवायच्या असतील, तर 'ज्यापाशी आरमार, त्याचा समुद्र' हे सूत्र विसरून चालणार नाही. म्हणूनच, छत्रपती शिवाजी महाराज 'भारतीय नौदलाचे जनक' आहेत. शिवजयंतीच्या निमित्ताने त्यांच्या या अफाट कार्य कर्तृत्वाला मानाचा मुजरा!

**- डॉ. श्याम टरके, सहायक संचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय, लातूर**

# लग्नाचं आमिष आणि शारीरिक संबंधांवर सर्वोच्च न्यायालयाचा प्रहार; 'विवाहोत्तर' नव्हे, 'विवाहपूर्व' संबंधांवर ओढले कडक ताशेरे!

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/प्रतिनिधी/** लग्नाचं वचन दिलं आणि फसवून शरीरसंबंध ठेवले, असे आरोप करत दाखल होणाऱ्या बलात्काराच्या गुन्ह्यांवर आता देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत कडक आणि तितकीच महत्त्वाची टिप्पणी केली आहे. लग्नापूर्वी कुणीही कोणावर आंधळा विश्वास ठेवू नये, अशा शब्दांत न्यायालयाने तरुणींना आणि तरुणांनाही धोक्याचा इशारा दिला आहे. केवळ लग्नाचे वचन मिळाले म्हणून शारीरिक संबंध ठेवणे किती धोक्याचे ठरू शकते, याचे वास्तव आता सर्वोच्च न्यायालयाने जगासमोर मांडले आहे.मॅट्रिमोनियल वेबसाईटवरून ओळख झाली, दुबई आणि दिल्लीत भेटीगाठी झाल्या, लग्नाचं आश्वासन मिळालं आणि शारीरिक संबंध प्रस्थापित झाले. पण जेव्हा सत्य समोर आलं की आरोपी आधीच विवाहित आहे आणि त्याने दुसरे लग्नही केले आहे, तेव्हा पीडितेने बलात्काराचा गुन्हा दाखल केला. सत्र न्यायालय आणि उच्च न्यायालयाने जामीन नाकारल्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले.

**सावधान!**

न्यायालयाचे ते **'जळजळीत'** निरीक्षण न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी करताना जे म्हटले, ते आजच्या पिढीसाठी डोळे उघडणारे आहे. न्यायालयाने म्हटले की,जुना विचार की वास्तव?: कदाचित आम्ही जुन्या विचारांचे असू, पण लग्नाआधी मुलगा आणि मुलगी हे पूर्णपणे अनोळखी असतात. नात्यात कितीही घट्टपणा असला तरी, लग्नापूर्वी शारीरिक संबंध कसे ठेवले जाऊ शकतात, हे समजण्यापलीकडे आहे.**सावधगिरी बाळगाः** लग्नापूर्वी कोणावरही डोळे झाकून विश्वास ठेवू नका. तुम्ही अत्यंत सावधगिरी बाळगायला हवी होती.**परदेशवारीवर प्रश्नचिन्हः** लग्नापूर्वीच आरोपीसोबत परदेशात फिरण्याच्या पीडितेच्या निर्णयावरही न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले.**तज्ज्ञांचे मतः** कायद्याचा शस्त्र म्हणून वापर नको! या संदर्भात महेश एस. धनावत (कार्याध्यक्ष, नोटरी असोसिएशन) यांनी कायद्याच्या गैरवापराबद्दल परखड मत मांडले आहे. ते म्हणतात प्रत्येक तुटलेलं नातं म्हणजे बलात्कार नसतो. दोन प्रौढ व्यक्तींनी संमतीने ठेवलेले संबंध आणि सुरुवातीपासूनच फसवणुकीच्या उद्देशाने दिलेले खोटे वचन यात पुसटशी पण महत्त्वाची रेषा आहे. फौजदारी कायद्याचा वापर सूड उगवण्यासाठी किंवा वादांना गुन्हेगारी स्वरूप देण्यासाठी होता कामा नये.

**कायद्याचा आधारः कलम ३७५ काय सांगते?**

सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही स्पष्ट केले आहे की, जर लग्नाचे वचन सुरुवातीपासूनच खोटे असेल आणि आरोपीचा लग्नाचा कोणताही हेतू नसेल, तरच ती 'तथ्याची चुकीची समजूत' मानली जाते. मात्र, जर संबंध दीर्घकाळ संमतीने राहिले असतील आणि नंतर काही कारणाने लग्न झाले नाही, तर त्याला प्रत्येक वेळी बलात्कार म्हणता येणार नाही.

**या बातमीचा 'आक्रमक' निष्कर्ष**

न्यायालयाचे हे निरीक्षण म्हणजे तथाकथित **'लिव्ह-इन'** आणि **'कॅज्युअल'** संबंधांच्या नावाखाली वावरणाऱ्यांसाठी एक चपराक आहे.

स्वतःच्या कृत्याची जबाबदारी दुसऱ्यावर किंवा कायद्यावर ढकलण्यापूर्वी स्वतःच्या मर्यादा ओळखा, असाच संदेश यातून मिळतोय.पार्श्वभूमी तपासा: मॅट्रिमोनियल साईटवर भेटलेल्या व्यक्तीची माहिती घेतल्याशिवाय भावनिक गुंतवणूक करू नका.खाजगी आयुष्य जपून: खासगी व्हिडिओ आणि फोटो देण्यापूर्वी शंभर वेळा विचार करा, कारण त्याचा वापर नंतर ब्लॅकमेलिंगसाठी होऊ शकतो. कायद्याचे संरक्षण कोणाला?: कायदा खऱ्या पीडितांच्या पाठीशी आहे, पण 'संमतीने' केलेल्या कृत्याला 'बलात्कार' ठरवून कायद्याचा पोरखेळ करणाऱ्यांना आता न्यायालय थारा देणार नाही.पुढील पाऊल: तुम्हाला या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या 'विवाहपूर्व संबंधां'वरील भूमिकेवर काय वाटते? अधिक कायदेशीर विश्लेषणासाठी मला विचारू शकता.

# शिवाजी महाराज की जय

दि एकोणवीस. शिवाजी महाराजांची जयंती. ज्या राज्यामध्ये निजामशाही आणि आदिवशहाचा वचक होता. ज्या राज्यामध्ये देशमुख देशपांडे इत्यादी वतनदार आपापसात भांडत होते. तसेच ज्या राज्यामध्ये मराठ्यांची अस्मिताच नाही तर संपूर्ण महाराष्ट्र पिंजून जात होता. त्या राज्याला आदिलशाही आणि निजामशाही मुक्त करणारा माणूस जर कोणी असेल, तर त्यात शिवाजी महाराजांचं नाव अग्रस्थानी घ्यावं लागतं. अगदी बालपणापासूनच शिवरायांचा स्वभाव हा दांडगा असल्यामुळं शिवरायाच्या वाटेला कोणी जात नसत.शिवरायांबाबत सांगायचं झाल्यास शिवरायांना त्यांची आई जीजाबाईनं घडवलं. ज्यावेळी शिवरायांचा जन्म झाला, त्यावेळी त्यांचे वडील शहाजीराजे हे लढाईत गुंतले होते. त्यातच शहाजीराजांनी शिवरायांचा जन्म चांगल्या परिस्थीतीत व्हावा म्हणून लढाईवर जाण्याआधी जीजामातेला शिवनेरी किल्ल्यावर अगदी सुरक्षीत ठेवलं. तिथंच पुढं शिवरायांचा जन्म झाला. ती तारीख म्हणजे १९ फेब्रुवारी १६३०. या तारखेबाबतही लोकांमध्ये संभ्रम आहे. कोणी तीन मार्च तर कोणी एक मे ही शिवरायांची जन्मदिनांक सांगतात.लहान असतांना शिवराय हे आईच्या सानिध्यात होते. शिवनेरीवर असलेल्या शिवाई देवीच्या नावावरुन शिवाजीचं शिवाजी नाव ठेवल्यानंतर त्याचं खरं शिक्षण हे आईनं केलं एवढंच नाही तर त्या शिवरायाचा पाहिजे त्या प्रमाणात लाड न करता त्याला स्वराज्यासाठी वाहून टाकलं. त्या शिवरायांना लहानपणापासूनच राम, क्रिष्ण व अभिमन्यूच्या कथा सांगून शुरवीर कसे असतात ते अगदी शिवरायांच्या रोमारोमात भरलं. त्यातच त्यांना आध्यात्मीक धडे सुद्धा दिले. संत ज्ञानेश्वरापासून तर संत तुकारामापर्यंतच्या गोष्टी त्यांना शिकवल्या. एवढंच नाही तर शिवरायांना युद्धनीती आणि राजनीती शिकविण्यासाठी वेगवेगळ्या शिक्षकांची शिवनेरीवर नियुक्ती केली. त्यातच ते राज्यकारभार करणे, घोडा भरधाव फेकणे, चोरवाटा शोधणे, तलवार चालवणे, भाला फेकणे इत्यादी गोष्टी शिवराय शिकले.

अगदी लहानग्या वयात शिवराय मातीचे किल्ले बनवणे, हत्ती बनवणे हे खेळ खेळायचे. त्यातच लहान वयात त्यांनी त्या सह्याद्रीच्या द-याखो-यातील लहान लहान आदिवासी मुलांना आपले मित्र बनवले. ज्या मित्रांनी पुढे जावून शिवरायांसाठी आपल्या प्राणांची आहूती दिली. पण शिवरायांवर थोडीशी आचही येवू दिली नाही. या मावळ्यांच्या मुलांसोबत शिवराय काय करायचे? तर चोरवाटा शोधायचे, त्या मुलांना तलवारबाजी शिकवली, एवढंच नाही तर याच शिवरायांनी रानावनात जावून मावळ्यांच्या मुलासोबत वावरतांना आपलं जेवन त्यांना दिलं व त्यांची कांदाभाकर त्यांनी खाल्ली. त्यामुळं साहजिकच शिवरायांबाबत आत्मीयता मावळ्यांच्या मुलांमध्ये निर्माण झाल ी. ही आत्मीयता निर्माण करण्यासाठी शिवराय त्या मावळ्यांच्या मुलांच्या घरी जात. त्यांच्या आईवडीलांशी संवाद साधत. एवढंच नाही तर त्यांच्या मायबापाशी संवाद करीत. याच संवादातून पुढे स्वराज्याचं महत्व त्या मावळ्यांच्या मायबापांनी आपल्या मुलांनाही समजावून दिलं होतं. हेच स्वराज्याचं महत्व शिवराय स्वतःही मावळ्याच्या मुलांना समजावून देत.

अगदी अल्प वयातच मावळ्यांना घेवून शिवरायांनी मावळ्याच्या मुलांसमोर रायरेश्वराच्या देवालयात स्वराज्यस्थापनेची प्रतिज्ञा केली. त्यातच ज्या वयात मुलांचं खेळण्याबागडण्याचं वय असतं. त्या अगदी अल्प वयात म्हणजे वयाच्या चौदाव्या वर्षीच त्यांनी तोरणा किल्ला जिंकला. त्यातच जे काम आपण आपल्या उभ्या हयातीत करु शकत नाही. त्याच अल्प वयात त्यांनी सर्व गोष्टीचा विचार करुन तोरणा किल्ल्याची डागडुजी केली. त्याला नवं नाव दिलं प्रचंडगड. त्यातच या तोरण्याचं बांधकाम करतांना ज्या चार सोन्याच्या घागरी शिवरायांना सापडल्या, त्या सोन्याचा वापर शिवरायांनी पुढे दुसरे किल्ले बांधण्यासाठी केला. पुढे एक एक करीत करीत शिवरायांनी जे किल्ले जिंकण्याचा सपाटा लावला. त्याला थांबवणं कठीण होतं.

आदिलशहानं शहाजीराजांना समजावून पाहिलं. परंतू काहीच उपयोग झाला नाही. हे पाहून की काय, आदिलशहा चिडला. त्यांनी त्यावर उपाय काढण्यासाठी विजापुरात बैठक बोलावली.बडी साहेबा. आदिलशाही महाराणी ही अध्यक्षस्थानी. पैजेच तबकात विडा. त्यांनी उचलावा. जो शिवाजीचा अंत करेल. मग घोषणा झाली. घोषणेनुसार विजापूर दरबारातील बडा तुफान ताकदीचा व धिप्पाड देहाचा सरदार अफदलखान उभा झाला. त्यानं तबकातील विडा उचलला व आश्चर्य करीत म्हटलं.कोण शिवाजी? कुठला शिवाजी? मी आत्ताच त्याला जीवंत वा मारलेला पकडून आणतो.अफजलखान तुफान ताकदीचा व धिप्पाड देहाचा होता. त्याला आपल्या ताकदीवर गर्व होता. त्याला वाटत होतं की आपण शिवरायांचा बिमोड करु शकतो. तसं पाहता त्याला शिवरायांच्या बाबतीत कोणतीच माहिती नव्हती. विडा उतलताच तो प्रतापगड पायथ्याशी आला. शिवाजी युद्धासाठी सज्ज व्हावा वा शरण यावा. म्हणून त्यानं आजूबाजूच्या गावांना व विशेषतः देवळांना त्रास देवू लागला. जबरदस्तीनं तो या तमाम महाराष्ट्रातील स्रीयांच्या इज्जती लुटू लागला. एवढेच नाही तर पशूधनांनाही ठेच पोहोचवू लागला. त्याच्या अशा प्रकारच्या उपद्रव्यानं शिवरायांना वाईट वाटत होतं. शेवटी त्यांनी विचार केला की आपण अफजलखानाला ठार करायचे.अफजलखानाला समोरासमोर मारता येत नाही. म्हणून शिवरायांनी त्याच्याशी युक्तीनं लढा देण्याचा विचार केला. त्यांनी खान बेसावध राहावा म्हणून आपण त्यांना फारच घाबरतो अशीही सुचना पाठवली. त्यातच खान बेसावध तर झालाच. शिवाय तो निर्भीडही झाला. शेवटी तो शिवरायांच्या म्हणण्यानुसार वागायला तयार झाला. शिवरायांनी खानाला प्रतापगडाच्या पायथ्याशी भेटायला बोलावले. भेट ठरली.शिवरायांनी जय्यत तयारी केली. कारण त्यांना खानाचा डाव माहित होता. भेटीदरम्यान शिवरायांनी खानाच्या म्हणण्यानुसार आलिंगण दिलं. त्यातच शिवराय सावधच होते. शेवटी खानानं कपटी डाव साधला. शिवरायांवर कट्यारीचा वार केला. त्यातच शिवरायांनी तो वार पुरता हुकवला व अस्तनीतून बिचवा काढून खानावर वार करुन वाघनख्यांनी खानाचं पोट फाडून टाकलं. झालं, क्षणातच धिप्पाड देहाचा खान मरण पावला.खान मरण पावताच शिवरायांचा दरारा आजूबाजूला फारच वाढला. एकेक क्लुप्त्या करीत शिवराय आदिलशाहाला पराभूत करीत होते. निजामशाही तर पावलंच बाहेर काढत नव्हती. शिवरायांसमोर शेवटी या आदिलशाहानं शरणागती पत्करली. त्यानंतर शिवरायांनी आपला मोर्चा मोगलांकडे वळवला.

त्यावेळी मोगल सम्राट औरंगजेब ह्यानेही डाव साधला. त्यानं शिवरायांच्या पराक्रमी चर्चा ऐकल्या होत्या. त्यानं शिवरायांना भेटीला आग्र्याला बोलावले. ज्यावेळी शिवराय आग्र्याला औरंगजेबाला भेटायला गेले. तेव्हा शिवराय महाराष्ट्राचे राजे असूनही त्यांचा आग्र्याला अपमान केला गेला. त्यांना दुस-या क्रमांकाच्या रांगेत उभे केले. शिवाय त्यांना नजरकैदेतही टाकले.नजरकैदेत पडल्यानंतर शिवरायांनी आजारपणाचं सोंग केलं. त्यातच एक दिवस ते व त्यांचा मुलगा संभाजी मिठाईच्या पेटा-यात बसून ते प्रसारही झाले.शिवरायांनी आपल्या जीवनात खुप सा-या गोष्टी केल्या. मुसलमान झालेल्या नेतोजी पालकरांना हिंदू धर्मात आणले. तानाजीच्या मृत्यूनंतर त्याच्या उमरठे गावी जावून रायबाचं थाटामाटात विवाह केला. त्यांनी शायीस्तेखानाची बोटं तोडली. एवढंच नाही तर पुरंदरच्या लढाईत मुरारबाजी मेल्ल्यानंतर होत असलेला स्वकीय माणसाचा संहार पाहून पुरंदरचा तह केला. त्यातच तेवीस किल्ले आणि चार लक्ष होनाचा मुलूख मोगलांना दिला. पुढे राज्याची गरज लक्षात घेता कोंढाण्यासारखा बळकट किल्ला हातात घेतला. त्यामध्ये तानाजीसारखा बालपणीचा मित्र गमवावा लागला.

शिवाजीला वाचविण्यासाठी ज्या मराठे सरदारांनी प्राणांची बाजी लावली. त्यात बाजीप्रभू, तानाजी, जीवा महाला, मदारी मेहतर, शिवा काशीद यांचं बलिदानही विसरता येत नाही. त्यांनी जर बलिदान दिलं नसतं, तर शिवाजी महाराजंही दिसले नसते. त्या असंख्य शिवाजींच्या मावळ्यांमुळे हे स्वराज्य उभं राहिलं. त्याला पुढं नाव दिलं हिंदवी स्वराज्य.हिंदवी स्वराज्य हे मावळ्यांच्या बलिदानातून साकार झालेलं स्वराज्य. प्रत्येक आई आपल्या मुलाला कोणतीही क्षति पोहोचू नये यासाठी प्रयत्न करते. स्वतः संकटं झेलते. खपते, मरते. पण जीजाबाईनं त्याचा विचारच केला नाही. तिला माहित होतं की तोरणा गडाच्या युद्धात शिवराय मरुही शकते. तरी प्रेरणा दिली की हे शिवा, तू हा तोरणा जिंकू शकतोस आणि काय आश्चर्य तोरणा जिंकला. पुढे अफजलखान भेटीलाही जातांना शिवराय आई जीजामातेला म्हणाले की वाचलोच तर परत येईल. नाही वाचलोच तर मासाहेब आपण संभाजीला गादीवर बसवायचं व राज्य सांभाळायचं. त्यावेळी त्याच्या जन्मदात्या आईला काय वाटलं असेल. तरीही तिनं आज्ञा दिली आणि सांगीतलं की तू जर माझा मुलगा असशील तर त्या अफजलखानाचं मुंडकंच कापून आणशील. पुढं आग्र्यालाही जातांना तेच घडलं. शिवरायांनी राज्यभिषेक केला खरा. पण हे राज्य निर्माण करण्याचं स्वप्न जीजाबाईनं दाखवलं होतं. नव्हे तर ते राज्य तमाम मावळ्यांच्या बलिदानातून साकार झालं आहे. आज मात्र याच शिवरायांच्या नावावर केवळ राजकारण सुरु आहे.

ऐरी, गैरी सारीच मंडळी निव्वळ शिवाजी महाराज की जय तर म्हणतात. पण तसे वागण्याचा प्रयत्न करतात का? निव्वळ दाढी वाढवून वा वेषभुषा करुन शिवाजी बनत नाही, तर शिवाजी बनायला ती शिवरायांची दृष्टी हवी. ती स्वप्न दाखवणारी जीजामाताही हवी आणि ते प्राणांची बाजी लावणारे मावळेही हवे. बापू बापू म्हणत अगदी तरणेताठ होईपर्यंत जोपासणारी आमची आई नको आणि महत्वाची एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. ती ही की जे शिवाजी शेकडो महिलांची अब्रू वाचवीत होते. आपण आपल्या वस्तीतील एका जरी महिलांची अब्रू वाचवली तरीही शिवराय बनल्याचं सार्थक होईल. तसेच ज्याप्रमाणे शिवराय राज्यातील प्रत्येकाला मदत करीत होते.

आपण एका व्यक्तीला जरी मदत केली तरी आपल्यातला शिवाजी प्रकर्षानं दिसेल यात शंका नाही. शिवरायांनी तर एक आदर्श निर्माण करुन दिला आपल्यासमोर. आपणही त्याच आदर्शाचा आदर्श बाळगून केवळ युद्धानं नाही तर शांतीनं या काळातील आदिलशाही, निजामशाही व मोगलशाही वृत्तीच्या माणसाच्या मनातील वाईट विचारांचा बिमोड करावा.

जेणेकरुन शिवाजीच्या आत्म्यालाही शांती वाटेल व ख-या अर्थानं हिंदवी स्वराज्य नाही तर बलाढ्य अशा स्वरुपाचं स्वराज्य आपल्याला दिसेल यात शंका नाही.

**- अंकुश शिंगाडे नागपूर**

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस


## छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना अत्यंत उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणा देत महाराजांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले.

यावेळी महसूल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती होती. प्रामुख्याने खालील मान्यवर उपस्थित होते:

संभाजी अडकुणे, अपर जिल्हाधिकारी,संजय शिंदे, नायब तहसीलदार,प्रेमसिंग राजपूत, महसूल सहायक,जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारीवृंद.अभिवादन केल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासकीय कौशल्याचे आणि लोककल्याणकारी स्वराज्याचे स्मरण करण्यात आले. महाराजांचे विचार आणि त्यांचे कार्य आजही प्रशासनासाठी मार्गदर्शक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर यावेळी शिवमय झाला होता.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवजन्मोत्सवाचा जल्लोष; सांस्कृतिक आणि महसूल विभागाचा स्तुत्य उपक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि महसूल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दि. १८ व १९ फेब्रुवारी रोजी मराठवाडा महसूल प्रबोधिनी येथे आयोजित या भव्य सोहळ्यात ऐतिहासिक परंपरेचा जागर आणि सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडले. दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात शिवरायांच्या विचारांचा जागर करण्यात आला.

दिमाखदार उद्घाटन आणि मान्यवरांची उपस्थिती

कार्यक्रमाचा प्रारंभ अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे व उपजिल्हाधिकारी श्रीमती संगीता राठोड यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाला. यावेळी बोलताना मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रशासन पद्धतीचे महत्त्व अधोरेखित केले.महाराजांचा पराक्रम, त्यांची दूरदृष्टी आणि सर्वसामान्यांचे हित जोपासणारी प्रशासन पद्धती ही आजही तितकीच लागू आहे. आजच्या पिढीने या आदर्शाचा अवलंब करणे काळाची गरज आहे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

कलाकारांनी जिवंत केला इतिहास

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण श्री. खंडेराय कला मंडळम यांच्या ३५ कलावंतांच्या पथकाचे सादरीकरण ठरले. महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासावर आधारित विविध कलाप्रकारांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले:



**पोवाडा:** शिवचरित्रातील थरारक प्रसंग पोवाड्याच्या माध्यमातून जिवंत करण्यात आले.**नृत्यनाट्य:** स्वराज्याच्या स्थापनेचा संघर्ष आणि महाराजांचे शौर्य नाट्यरूपाने सादर झाले.लोककला: लावणी आणि पारंपरिक लोकनृत्यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विविधतेचे दर्शन घडले.**देशभक्तीपर गीते:** सभागृहातील वातावरण चैतन्यमय आणि राष्ट्रप्रेमाने भारावून गेले होते.

शिवचरित्रावर अभ्यासपूर्ण प्रकाश

प्रा. समाधान इंगळे यांनी आपल्या प्रेरणादायी व्याख्यानातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनप्रवासाचा आढावा घेतला. त्यांनी प्रामुख्याने खालील मुद्द्यांवर प्रकाश टाकला.**शिवकालीन प्रशासन:** महाराजांचे शिस्तबद्ध नियोजन आणि जलव्यवस्थापन.**सामाजिक बांधिलकी:** जाती-पातींच्या पलीकडे जाऊन सर्वांना एकत्र गुंफण्याचे कार्य.**स्वराज्य संघर्ष:** प्रतिकूल परिस्थितीतून उभे केलेले रयतेचे राज्य.या सोहळ्यासाठी विविध सरकारी विभागांचे अधिकारी, कर्मचारी, मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि नागरिक उपस्थित होते. संपूर्ण परिसर 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने पार पडलेल्या या सोहळ्याने उपस्थितांच्या मनात राष्ट्राभिमान जागृत केला. थोडक्यात सांगायचे तर, हा शिवजन्मोत्सव केवळ एक सोहळा न ठरता, स्वराज्याची मूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचवणारा एक वैचारिक आणि सांस्कृतिक ठेवा ठरला आहे.

## टाकळी येथील शिवेश्वर विद्यालयात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी



शिवरायांच्या जयघोषाने परिसर दुमदुमला

**आत्ताच ढक्सप्रेस**

**टाकळी अंतूर (प्रतिनिधी)** कन्नड तालुक्यातील शिवेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी अंतूर येथे १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात साजरी करण्यात आली. माजी जिल्हा परिषद सदस्य तथा विद्यालयाचे प्राचार्य संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या सोहळ्याने संपूर्ण गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमाची सुरुवात शिवरायांच्या भव्य प्रभात फेरीने झाली. या मिरवणुकीत शिवरायांच्या पोशाखातील एक विद्यार्थी आणि जिजाऊंच्या वेशातील दोन विद्यार्थिनी आकर्षणाचे केंद्र ठरल्या होत्या. अनेक विद्यार्थिनींनी नऊवारी साडी परिधान करून पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडवले. भालदार, चोपदार आणि घोड्यांसह काढण्यात आलेल्या या मिरवणुकीने संपूर्ण टाकळी गाव शिवमय झाले होते.

गावातील वेशीजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व आरती प्राचार्य संदीप पाटील यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर विद्यालयाच्या प्रांगणात उपमुख्याध्यापक अशोक सपाटे यांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

याप्रसंगी आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पोवाडे, गीते आणि भाषणांतून शिवरायांच्या देदिप्यमान जीवनकार्याचा परिचय करून दिला. कुमारी पंकजा गवळी आणि कुमारी वेदिका झोड यांनी उत्कृष्ट भाषणे केली. त्यांच्या या कौशल्याबद्दल विद्यालयाचे पर्यवेक्षक भिकन मेटे आणि नारायण ताटू यांच्या हस्ते त्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक सपाटे यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना शिवरायांचे विचार अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना मसालेभात व गोड पदार्थांचे भोजन देण्यात आले.या संपूर्ण सोहळ्याचे सूत्रसंचालन विठ्ठल सोळुंके सर यांनी केले. शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि ग्रामस्थांच्या मोठ्या उपस्थितीत या सोहळ्याची सांगता झाली.

# जवखेडा बु. नगरी शिवमय! छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या मिरवणुकीला शिवभक्तांचा महासागर

**आत्ताच एक्सप्रेस**

**जवखेडा बु. (प्रतिनिधी)** कन्नड तालुक्यातील जवखेडा बु. येथे १९ फेब्रुवारी रोजी शिवभक्तीचा अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळाला. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याची मिरवणूक आणि अनावरण सोहळा अत्यंत दिमाखात पार पडला. या ऐतिहासिक सोहळ्या निमित्त संपूर्ण जवखेडा नगरी भगव्या रंगात न्हाऊन निघाली होती.दिनांक १९ फेब्रुवारी रोजी पहाटेपासूनच गावात उत्सवी वातावरण होते. घराघरांवर फडकणारे भगवे झेंडे, ठिकठिकाणी उभारलेल्या स्वागत कमानी, आकर्षक रांगोळ्या आणि फुलांच्या सजावटीमुळे गावाला जणू चैतन्याचे रूप प्राप्त झाले होते.

भव्य मिरवणूक आणि 'जय शिवराय'चा जयघोष

सकाळी विधीवत पूजन आणि आरती झाल्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुकीला प्रारंभ झाला. सजवलेल्या वाहनावर विराजमान असलेला महाराजांचा अश्वारूढ पुतळा पाहण्यासाठी पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.पारंपारिक वेशभूषा: युवक-युवती भगव्या फेट्यांत आणि पारंपारिक वेशभूषेत सहभागी झाले होते.

स्वागत: गावातील मुख्य मार्गावरून मिरवणूक जात असताना महिलांनी ठिकठिकाणी आरती ओवाळून व पुष्पवृष्टी करून पुतळ्याचे स्वागत केले. सांस्कृतिक दर्शन: टाळ-मृदंगाच्या तालावर चालणाऱ्या दिंड्या, शिवचरित्र सांगणारे पोवाडे आणि देशभक्तीपर गीतांनी वातावरण भारावून गेले होते. सकाळी ११ वाजता पुतळ्याचा भव्य अनावरण सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याला अध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.प्रमुख उपस्थिती: १००८ शनिभक्त सुखदेव महाराज (वाकी), प. पू. विद्यानंद महाराज (तळणी), प. पू. परमेश्वर महाराज (अंधारी) यांच्यासह राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांनी आपल्या मनोगतातून महाराजांच्या स्वराज्याची संकल्पना, त्यांचे आदर्श आणि समाजातील एकात्मतेचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. अनावरण होताच संपूर्ण परिसर 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी दणाणून गेला.कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने झाली, ज्याचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शिवप्रतिष्ठान उत्सव समिती आणि जवखेडा बु. ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे




सूत्रसंचालन उत्तम आघाडे यांनी केले, तर विठ्ठल काचोळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.थोडक्यात सांगायचे तर: या भव्य सोहळ्याने जवखेडा बु. गाव शिवभक्तीच्या नकाशावर ठळकपणे उमटले असून, स्वराज्याचा विचार घराघरात पोहोचवण्याचा संकल्प ग्रामस्थांनी यावेळी केला.

## सात वर्षीय दानिश खानचा पहिला रोजा पूर्ण; जिद्द आणि संयमाचे परिसरातून कौतुक

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** शहरातील रेल्वे स्टेशन भागातील जागीदार कॉलनीमध्ये एका सात वर्षांच्या चिमुकल्याने आपल्या भक्तीचा आणि संयमाचा परिचय दिला आहे. दानिश अशराफ खान याने



रमजानच्या पवित्र महिन्यात वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी आपला आयुष्यातील पहिला 'रोजा' (उपवास) यशस्वीरीत्या पूर्ण केला असून, त्याच्या या जिद्दीचे सर्वत्र कौतुक होत आहे.रमजानचा महिना हा आत्मसंयम आणि प्रार्थनेचा काळ मानला जातो.
दानिशने पहाटे 'सहरी' (उपवासापूर्वीचे जेवण) केल्यापासून ते संध्याकाळी सूर्यास्तापर्यंत (इफ्तार) अन्नाचा कणही न घेता आणि पाण्याचा थेंबही न पिता आपला रोजा पाळला. एवढ्या लहान वयात दिवसभर न थकता आणि कोणतीही तक्रार न करता त्याने दाखवलेली शिस्त सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

संध्याकाळी अजान झाल्यानंतर कुटुंबीयांसोबत बसून दानिशने आपला पहिला इफ्तार केला. यावेळी त्याच्या चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान पाहायला मिळाले. दानिशचे वडील अशराफ खान आणि कुटुंबातील इतर सदस्यांनी त्याला आशीर्वाद देत त्याचे अभिनंदन केले.

लहान वयातच मुलांमध्ये धार्मिक संस्कार आणि संयमाची सवय लागावी, या उद्देशाने दानिशने स्वतःहून रोजा ठेवण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्याने ती यशस्वीरीत्या पूर्ण केली याचा आम्हाला अभिमान आहे, अशी भावना त्याच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली.

दानिशच्या या यशाची माहिती मिळताच जागीदार कॉलनीतील नागरिक, मित्रपरिवार आणि नातेवाईकांनी त्याचे विशेष कौतुक केले. एवढ्या लहान वयात अशी जिद्द दाखवणारा दानिश इतर मुलांसाठीही एक आदर्श आहे, अशा शब्दांत स्थानिकांनी त्याचे अभिनंदन केले. सध्या सोशल मीडियावरही या चिमुकल्या रोजेदाराचे फोटो व्हायरल होत असून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# गंगापूरमध्ये शिवजयंतीचा अभूतपूर्व उत्साह; 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'च्या घोषणांनी शहर दुमदुमले

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर (प्रतिनिधी)** अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा उत्सव गंगापूर शहरात मोठ्या उत्साहात, भक्तीभावाने आणि पारंपारिक जल्लोषात साजरा करण्यात आला. संपूर्ण शहर भगवेमय झाले असून, विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांनी शिवप्रेमींचे लक्ष वेधून घेतले.

नगरपरिषद उद्यानातील (शिवतीर्थ) छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या मुख्य शासकीय कार्यक्रमास लोकनियुक्त नगराध्यक्ष संजय जाधव, मुख्याधिकारी संतोष आगळे, उपनगराध्यक्ष अमोल जगताप यांच्यासह सर्व सन्माननीय नगरसेवक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.यावेळी उपस्थितांनी दिलेल्या जय भवानी, जय शिवाजी आणि छत्रपती शिवाजी महाराज की जय या घोषणांनी संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

**शिवचरित्राचा जागर आणि तरुणांना आवाहन**

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा दिला. महाराजांची न्यायनिष्ठा, स्त्री-सन्मान, सर्वधर्मसमभाव आणि गनिमी काव्याच्या युद्धनीतीचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले.आजच्या तरुणांनी केवळ घोषणा न देता महाराजांच्या विचारांचा आदर्श घेऊन स्वच्छ, सुसंस्कृत आणि प्रगत शहर घडवण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन नगराध्यक्ष संजय जाधव यांनी आपल्या भाषणात केले.

**रक्तदान शिबिरातून सामाजिक बांधिलकी**

उत्सवाचे औचित्य साधून सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती आणि सुवर्ण सोशल फाउंडेशन यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान हेच श्रेष्ठ दान हा संदेश देत शेकडो युवकांनी या शिबिरात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. युवकांच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

**दिवसभर विविध कार्यक्रमांची रेलचेल**



**सांस्कृतिक कार्यक्रम:** शहरात ठिकठिकाणी पोवाडे, व्याख्याने आणि जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**आकर्षक रोषणाई:** सायंकाळी शिवतीर्थ उद्यान परिसरात विशेष आतिषबाजी करण्यात आली. विद्युत रोषणाईने संपूर्ण परिसर उजळून निघाला आहे.**भगवे वातावरण:** शहराच्या मुख्य चौक आणि रस्त्यांवर भगवे झेंडे आणि कमानी उभारण्यात आल्याने गंगापूरमध्ये दिवाळीसारखा उत्साह पाहायला मिळाला.गंगापूरकरांनी एकत्र येत अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात शिवजयंती साजरी करून शिवरायांना मानाचा मुजरा अर्पण केला.

# नादरपूर येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी; शालेय विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने जिंकली ग्रामस्थांची मने

**आत्ताच एक्सप्रेस**

**नादरपूर (प्रतिनिधी)** कन्नड तालुक्यातील नादरपूर येथे १९ फेब्रुवारी रोजी 'अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज' यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहेबराव रंगराव निकम होते.या सोहळ्याचे मुख्य आकर्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नादरपूर येथील विद्यार्थ्यांनी सादर केलेले विविध कार्यक्रम ठरले. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ आणि मावळ्यांची वेशभूषा परिधान करून शिवकालीन इतिहास जिवंत केला.

यावेळी विद्यार्थ्यांनी महाराजांच्या जीवनावर आधारित पोवाडे, शाहिरी गीते, लोककला आणि प्रेरणादायी भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांच्या या अष्टपैलू सादरीकरणाबद्दल सर्व ग्रामस्थांच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक व अभिनंदन करण्यात आले. गावातील शिवप्रेमी मंडळाकडून गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वाटपही करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरचे प्रशासकीय




अधिकारी दिलीप निकम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आलेख उंचावत असून, ही भावी पिढी निश्चितच गावाचे नाव देशपातळीवर उज्ज्वल करेल.

कार्यक्रमाच्या शेवटी ग्रामपंचायतीच्या वतीने ग्रामपंचायत कर्मचारी रामराव बळी यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ आणि बक्षीस वाटप केले. उपस्थित सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या उत्सवामुळे संपूर्ण नादरपूर परिसरात शिवमय वातावरण निर्माण झाले होते.

# सात वर्षीय चिमुकल्याचा पहिला रोजा; मेहरान शहाचे लासूर स्टेशन परिसरात कौतुक

**आत्ताचक्सप्रेस**

**लासूर स्टेशन (प्रतिनिधी)** रमजानचा पवित्र महिना म्हणजे संयम, शिस्त आणि भक्तीचा काळ. या कडक उन्हाळ्यात जिथे मोठ्यांना उपवास करणे कठीण जाते, तिथे गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील एका सात वर्षांच्या चिमुकल्याने आपल्या जीवनातील पहिला रोजा (उपवास) यशस्वीरीत्या पूर्ण करून सर्वांची मने जिंकली आहेत.



**भक्ती आणि चिकाटीचा प्रत्यय**

लासूर स्टेशन - सावंगी परिसरातील शाह नगरमध्ये राहणारा मेहरान मोहसीन शहा (वय ७ वर्षे) याने रमजान महिन्यातील आपला पहिला उपवास पूर्ण केला. पहाटे सूर्योदयापूर्वी 'सहरी' करून त्याने दिवसभर अन्न-पाण्याविना राहून सायंकाळी 'इफ्तार' पूर्ण केला. वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी मेहरानने दाखवलेली ही जिद्द आणि चिकाटी पाहून परिसरातील नागरिकांकडून त्याचे विशेष कौतुक होत आहे.

**कुटुंबियांकडून उत्साहात स्वागत**

मेहराननें आपला पहिला रोजा पूर्ण केल्याबद्दल त्याचे वडील मोहसीन शहा, आजोबा रशिद शहा व लियाकत शहा यांनी त्याचे तोंड भरून कौतुक केले.

तसेच चुलते मोईन शहा, नईम शहा आणि मामा वसीम शहा यांच्यासह इतर नातेवाईक आणि मित्र परिवाराने त्याला शुभेच्छा देऊन त्याचे अभिनंदन केले.लहानपणापासूनच मुलांमध्ये धार्मिक संस्कार आणि संयमाची सवय लागावी, या उद्देशाने मेहरानने स्वतःहून रोजा ठेवण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्याने तो पूर्ण केल्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, अशी भावना त्याच्या कुटुंबियांनी व्यक्त केली.

# जालना येथील श्रीराम वाचनालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती जालना येथील प्रसिद्ध ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय येथे १९ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात शिवरायांच्या विचारांचा जागर करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. श्रीराम वाचनालयाचे कार्यकारणी सदस्य पंडीत सुधाकर भालेराव व संस्कृत शिक्षक संजय हेबारे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित वाचक आणि नागरिकांनी महाराजांना विनम्र अभिवादन केले.

**शिवचरित्र वाचनाची गरजः संजय हेबारे**

मनोगत व्यक्त करताना संजय हेबारे म्हणाले की, आजच्या पिढीला योग्य दिशा मिळण्यासाठी पालकांनी शिवचरित्र घराघरात पोहोचवणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी केवळ सोशल मीडियावर वेळ न घालवता वाचनालयातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावरील ग्रंथांचे वाचन करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**जगासमोर आदर्श राजाः मिलींद सावंत**

धरतीधन प्रतिष्ठानचे अध्यक्ष मिलींद सावंत यांनी महाराजांच्या युद्धकलेचा आणि प्रशासनाचा गौरव केला. ते म्हणाले की, अठरापगड जातींना सोबत घेऊन महाराजांनी स्वराज्य उभे केले. उत्कृष्ट राजा कसा असावा, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे शिवराय आहेत. आजही जगभरातील अभ्यासक त्यांच्या युद्धनीतीचा अभ्यास करतात.

**ग्रंथ वाचन हेच खरे ज्ञानः राधेशाम राजपूत**

यावेळी बोलताना राधेशाम राजपूत यांनी वाचन संस्कृतीवर भर दिला. खरे ज्ञान हे ग्रंथांमध्येच साठवलेले असते. विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर मर्यादित ठेवून पुस्तकांशी मैत्री करावी. महाराजांच्या राज्यात सर्व जाती-धर्मांना समान स्थान होते, हाच विचार आपल्याला पुढे न्यायचा आहे, असे ते म्हणाले या कार्यक्रमात बाल वाचक वल्लभ



शेलगावकर यानेही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शैलेंद्र बदनापुरकर यांनी मानले.या सोहळ्याला पांडुरंग काळे, आशिष उबाळे, कैलासचंद्र सराफ, विजय खिल्लारे, सोपान सरनाईक, विलास सुळ, अभिजित शेंडगे यांच्यासह मोठ्या संख्येने वाचक वर्ग आणि शिवप्रेमी उपस्थित होते.

## संक्षिप्त

### गोदावरी माध्यमिक विद्यालय गुरूपिंपरी येथे शिवजयंतीचा उत्साह; विद्यार्थ्यांनी साकारला शिवकालीन इतिहास



**आत्ताच एक्सप्रेस**

**गुरूपिंपरी (जालना)** तालुक्यातील गोदावरी माध्यमिक विद्यालय गुरूपिंपरी येथे अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. या सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण शालेय परिसर 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी साकारलेली विविध रूपे. शिवजयंतीनिमित्त आयोजित वेशभूषा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ, बालशिवाजी आणि मावळ्यांच्या पोशाखात सहभाग नोंदवला होता. कपाळावर चंद्रकोर, अंगात अंगरखा आणि हातात तलवार घेतलेले छोटेखानी 'शिवराय' पाहून उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फिटले.


विद्यार्थ्यांनी जागवल्या शिवरायांच्या स्मृती

केवळ वेशभूषाच नव्हे, तर विद्यार्थ्यांनी आपल्या ओघवत्या भाषणातून छत्रपती शिवरायांच्या शौर्याचा इतिहास मांडला. शिवरायांचे गड-किल्ले व्यवस्थापन, गनिमी कावा आणि अठरापगड जातीच्या मावळ्यांना सोबत घेऊन स्वराज्य स्थापनेचा त्यांचा प्रवास विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रभावीपणे सांगितला.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक बी. आर. कडूळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिवरायांचे विचार अंगीकारण्याचे आवाहन केले. याप्रसंगी सहशिक्षक जी. एम. सपकाळ, आर. जे. थोरात,अमोल सोळंके यांच्यासह शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते.

### रमजाननिमित्त जुन्या जालन्यातील मलिक अंबर मशीद उजळली; आकर्षक विद्युत रोषणाईने वेधले लक्ष

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/आजपासून पवित्र रमजान महिन्याला सुरुवात झाली असून, मुस्लिम बांधवांमध्ये मोठ्या उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. या निमित्ताने जुना जालना भागातील ऐतिहासिक मलिक अंबर (अंबड वेस) परिसरातील मशीद आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाली आहे.



मशिनिची नयनरम्य सजावट

रमजानचा महिना हा उपासना आणि संयमाचा महिना मानला जातो. या महिनाभराच्या उपवासाला (रोजा) आजपासून प्रारंभ झाला आहे. या विशेष प्रसंगी जुन्या जालन्यातील मुख्य ओळख असलेल्या मलिक अंबर मशीद आणि अंबड वेस परिसरात रंगीबेरंगी दिव्यांची आरास करण्यात आली आहे. रात्रीच्या वेळी ही विद्युत रोषणाई पाहण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत.पवित्र महिना: रमजान हा इस्लामिक कॅलेंडरमधील सर्वात पवित्र महिना मानला जातो.

**प्रार्थनाः** मशीद परिसरात तरावीहच्या नमाजसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

**सामाजिक सलोखाः** विद्युत रोषणाईमुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे आणि मांगल्याचे वातावरण निर्माण झाले असून, सर्वधर्मीयांकडून मुस्लिम बांधवांना रमजानच्या शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# तरुणांच्या जडणघडणीसाठी शिवविचारांची नितांत गरजः डॉ. एकनाथ शिंदे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी** /छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून, ते आजच्या आधुनिक युगात तरुणांसाठी दीपस्तंभाप्रमाणे आहेत. चारशे वर्षांपूर्वी महाराजांनी जो आदर्श घालून दिला, त्याची अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रमुख वक्ते डॉ. एकनाथ शिंदे यांनी केले.स्थानिक अंकुशराव टोपे महाविद्यालयात शिवजयंती निमित्त आयोजित 'विशेष व्याख्यान' कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. दादासाहेब गजहंस होते. व्याख्यानादरम्यान डॉ. एकनाथ शिंदे यांनी शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की,शिस्त आणि नियोजन: आधुनिक काळात यशस्वी होण्यासाठी शिवरायांचे वेळेचे नियोजन आणि शिस्त आत्मसात करणे आवश्यक आहे. स्त्री सन्मान व नैतिकता: महाराजांनी स्वराज्यात स्त्रियांना दिलेला सन्मान आणि जपलेली उच्च नैतिकता हा आजच्या समाजासाठी मोठा धडा आहे.नेतृत्व कौशल्य: शून्यातून विश्व निर्माण करण्याचे धैर्य आणि संघटनात्मक कौशल्य तरुणांनी आपल्या करिअरमध्ये वापरावे.अपयशातून शिक्षण: कठीण प्रसंगात डगमगून न जाता ध्येयाकडे वाटचाल करण्याचा आत्मविश्वास महाराजांच्या चरित्रातून मिळतो.



**अंकुशराव टोपे महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी; मान्यवरांचे प्रतिपादन**

**समाजहितासाठी शिवविचारांचे अनुकरण करा: डॉ. दादासाहेब गजहंस**

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. दादासाहेब गजहंस यांनी सांगितले की, केवळ जयघोष करून चालणार नाही, तर विद्यार्थ्यांनी महाराजांच्या विचारांचे प्रत्यक्ष जीवनात अनुकरण करावे. समाजहितासाठी कार्य करणे हीच खऱ्या अर्थाने शिवरायांना दिलेली मानवंदना ठरेल, असे आवाहन त्यांनी केले.

या सोहळ्याला महाविद्यालयातील मान्यवरांची विशेष उपस्थिती होती.उपप्राचार्य: डॉ. संजय पाटील, प्रा. पांडुरंग खोजे,पर्यवेक्षक: प्रा. रामप्रसाद भालेकर,कार्यालयीन अधीक्षक: सुरेश चव्हाण कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. बद्रीनाथ शिंदे यांनी केले. या प्रसंगी डॉ. पंडित राणमाळ, डॉ. कार्तिक गावंडे, डॉ. रामनाथ सांगोळे, डॉ. रामदास वैद्य, डॉ. सीमा निकाळजे, डॉ. अविनाश भालेराव, डॉ. मसूद अन्सारी, डॉ. शंकर तिकांडे यांच्यासह मोठ्या संख्येने प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. संपूर्ण परिसर शिवरायांच्या जयघोषाने आणि विचारांनी भारावून गेला होता.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त संभाजी उद्यान येथून मराठा समाजाची भव्य रॅली



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/संबंधित शहर: जय भवानी, जय शिवाजी आणि छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा गगनभेदी घोषणांनी आजचा परिसर दुमदुमून गेला. निमित्त होते अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे. या सोहळ्याचे औचित्य साधत आज मराठा समाज बांधवांच्या वतीने संभाजी उद्यान येथून एका भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळपासूनच संभाजी उद्यान परिसरात शिवप्रेमींची मोठी गर्दी जमू लागली होती. भगवे फेटे, हातात घेतलेले भगवे ध्वज आणि पारंपारिक वेशभूषेतील तरुण-तरुणी या रॅलीचे मुख्य आकर्षण होते. रॅलीच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

१. ढोल-ताशांचा गजर: रॅलीमध्ये सहभागी झालेल्या ढोल-ताशा पथकांनी उपस्थितांची मने जिंकली. तालावर धरलेला ठेका आणि शिवरायांच्या पराक्रमाच्या गाथांनी वातावरण भारावून गेले होते.२. चित्ररथ: रॅलीमध्ये शिवकालीन इतिहासाचे दर्शन घडवणारे विविध चित्ररथ सजवण्यात आले होते. यामध्ये गड-किल्ले, मावळे आणि महाराजांच्या स्वराज्याची झलक पाहायला मिळाली.

३. महिलांचा सहभाग: या रॅलीमध्ये महिला आणि युवतींचा सहभाग लक्षणीय होता. अनेक महिलांनी लेझीम पथकात सहभाग नोंदवत आपल्या कलेचे सादरीकरण केले.४. शिस्तबद्ध नियोजन: रॅली दरम्यान कोणतीही वाहतूक कोंडी होऊ नये आणि शांतता राखली जावी यासाठी मराठा समाजातील स्वयंसेवकांनी चोख नियोजन केले होते.

संभाजी उद्यानापासून सुरू झालेली ही रॅली शहरातील मुख्य मार्गावरून काढण्यात आली. ठिकठिकाणी या रॅलीचे जंगी स्वागत करण्यात आले.

नागरिकांनी आपल्या घराबाहेर रांगोळ्या काढून आणि फुलांची उधळण करून शिवरायांच्या या पालखीचे स्वागत केले.यावेळी बोलताना समाज बांधवांनी सांगितले की, महाराजांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचावेत आणि समाजात एकजूट राहावी, हाच या रॅलीचा मुख्य उद्देश आहे. या भव्य रॅलीमुळे संपूर्ण शहर शिवमय झाले होते.

# रामखेडा रेल्वे पटरीवर धारदार शस्त्रासह फिरणाऱ्या इसमाला बेड्या; मोठी दुर्घटना टळली!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** गुन्हेगारांनी कितीही सावज टिपण्याचा प्रयत्न केला, तरी खाकी वर्दीच्या नजरेतून सुटणे अशक्य आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. जालना जिल्ह्यातील बदनापूर-रामखेडा रेल्वे पटरी परिसरात हातात धारदार शस्त्र घेऊन दहशत माजवण्याच्या इराद्याने फिरणाऱ्या एका सराईत गुंडाला पोलिसांनी फिल्मी स्टाईलने झडप घालून ताब्यात घेतले. रोहित संतोष जाधव (रा. जुना जालना) असे या अटकेतील आरोपीचे नाव असून, पोलिसांच्या या 'धडक' कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.आज गुरुवार, १९ फेब्रुवारी रोजी पहाटेच्या सुमारास जेव्हा संपूर्ण शहर झोपेत होते, तेव्हा बदनापूर पोलिसांचे पथक गस्तीवर होते. सकाळी ८ वाजताच्या सुमारास पोलिसांना गुप्त बातमीदाराकडून अत्यंत खळबळजनक माहिती मिळाली. रामखेडा रेल्वे पटरी परिसरात एक इसम संशयास्पद रित्या वावरत असून त्याच्या हातात उघड्यावर चमकणारे धारदार हत्यार असल्याची माहिती मिळाली.

क्षणाचाही विलंब न लावता, रात्रीच्या गस्तीवर असलेल्या जांबाज पोलीस पथकाने घटनास्थळाकडे धाव घेतली.

रेल्वे पटरीचा परिसर निर्जन असल्याने आरोपी पळून जाण्याची दाट शक्यता होती. मात्र, बदनापूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक कुक्लारे, सहायक पोलीस निरीक्षक ढोबाळ, पोलीस अंमलदार अब्दुल बारी शेख आणि चालक सानप यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने परिसराला वेढा घातला.

पोलिसांना पाहताच आरोपीने पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र सतर्क पोलिसांनी त्याला शिताफीने जागीच झडप घालून दस्तबंद केले. त्याच्या ताब्यातून जीवघेणे धारदार शस्त्र जप्त करण्यात आले आहे.

अटकेत असलेल्या आरोपीचे नाव रोहित संतोष जाधव (वय अंदाजे २५-३०, राहणार: बालाजी मंदिर परिसर, डबलजीन, जुना जालना) असे आहे. भरवस्तीतून रेल्वे पटरीसारख्या निर्जन ठिकाणी तो शस्त्रासह काय करत होता? कोणाचा गेम करण्याचा त्याचा डाव होता? की तो एखाद्या मोठ्या दरोड्याच्या तयारीत होता? या दिशेने आता पोलीस कसून चौकशी करत आहेत.

नाईट ड्युटीवरील पोलिसांच्या सतर्कतेमुळे आज एक मोठा अनर्थ टळला आहे. जर हा इसम कोणावर हल्ला करण्याच्या उद्देशाने तिथे थांबला असेल, तर पोलिसांनी वेळीच त्याला जेरबंद करून एका निष्पाप जीवाचा जीव वाचवला आहे, अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.या कारवाईनंतर बदनापूर पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, परिसरात कोणताही संशयास्पद इसम किंवा हालचाल दिसल्यास तात्काळ पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा. आरोपी रोहित जाधव याच्यावर संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू आहे.

# आष्टीमध्ये अवैध दारूचा तांडव!

## प्रशासनाचे 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष? तळीरामांकडून सामान्य जनतेची उघड लूट!

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतूर (प्रतिनिधी, अंगद मुंढे)** परतूर तालुक्यातील आष्टी परिसरात सध्या कायद्याचे धिंडवडे निघत असून, देशी दारूची सर्रास आणि बेधडक विक्री सुरू आहे. एकीकडे दहावी-बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा सुरू असताना, दुसरीकडे आष्टीच्या रस्त्यांवरून दारूचे बॉक्स वाहून नेणाऱ्या गाड्यांचा राबता वाढला आहे. या गंभीर प्रकारामुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून, खाकी नेमकी कुणाच्या दबावाखाली किंवा आशीर्वादाने गप्प आहे? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.




**एमआरपीपेक्षा जास्त दराने विक्री; ग्राहकांच्या खिशाला कात्री**

केवळ अवैध विक्रीच नाही, तर आष्टीतील देशी दारू दुकानांवर ग्राहकांची उघड लूट सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ज्या देशी दारूच्या क्वॉर्टरवर ८० रुपये एमआरपी (छापील किंमत) आहे, ती चक्क ९० ते १०० रुपयांना विकली जात आहे. नियमांची पायमल्ली करून सुरू असलेल्या या जादा दराच्या वसुलीकडे राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि अन्न व औषध प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### आष्टी बनले अवैध दारू पुरवठ्याचे 'हब'

आष्टी हे सर्कल बाजारपेठेचे मुख्य केंद्र असून या गावाला सुमारे ५० खेडी जोडलेली आहेत. याच भौगोलिक स्थितीचा फायदा घेत तस्करांनी आष्टीला दारू पुरवठ्याचे केंद्र बनवले आहे.मोटारसायकल आणि चारचाकी गाड्यांमधून लाखो रुपयांच्या दारू बॉक्सची दिवसाढवळ्या वाहतूक केली जाते.ग्रामीण भागातील तांडे, वाड्या आणि वस्त्यांवरील किराणा दुकाने व टपऱ्यांपर्यंत हा माल पोहोचवला जात आहे.रस्त्याच्या कडेला आणि सार्वजनिक ठिकाणी तळीरामांचा वावर वाढल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**पोलीस प्रशासन सुस्त, पालक वर्गात दहशत!**

बोर्डाच्या परीक्षांचे वातावरण असतानाही शहरात दारूचा हा नंगानाच सुरू असल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात असून अनेकवेळा तोंडी तक्रारी करूनही पोलीस कोणतीही ठोस कारवाई करताना दिसत नाहीत. यामुळे वरदहस्त नेमका कुणाचा? या चर्चेला उधाण आले आहे. **नागरिकांचा सवालः** जर जिल्हाधिकारी आणि वरिष्ठ पोलीस अधिकारी कडक कारवाईचे आदेश देत असतील, तर आष्टीमध्ये कायद्याची अंमलबजावणी का होत नाही? अवैध दारू विक्रेत्यांना पाठीशी घालणारे अधिकारी कोण?

**आता कारवाई होणार की केवळ कागदी घोडे नाचवणार?**

आष्टीतील या वाढत्या गुन्हेगारी स्वरूपाच्या दारू विक्रीवर महाराष्ट्र पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग आता काय पाऊल उचलणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. तात्काळ चौकशी करून या रॅकेटचा पर्दाफाश करावा आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आष्टीतील सुज्ञ नागरिकांनी केली आहे. अन्यथा, तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813